# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/४३७०

दिनांक : २२/१०/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय – ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' साठी महाविद्यालयांनी Institute Profile ला मान्यता घेण्यासाठी शासनाने आयोजित केलेल्या कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत..

संदर्भ – शासन पत्र क्र. ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/२५८६ दि. २०/१०/२०१८

महोदय/महोदया,

''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' साठी पुणे शहरातील अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालयांनी Institute Profile ला मान्यता घेण्यासाठी शासनाने दि. **२२/१०/२०१८** ते **२४/१०/२०१८** या कालावधीत पुणे जिल्हयातील महाविद्यालयांसाठी **ए. के. के. खान न्यू. लॉ ॲकॅडमी, आझम कॅम्पस, कॅम्प, पुणे** येथे कार्यशाळा आयोजित केलेली आहे.

तरी, आपणांस कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित महाविद्यालयांनी शासनाने दिलेल्या सुचनेनुसार Institute Profile ला मान्यता घेण्यासाठी वरील ठिकाणी तातडीने उपस्थित रहावे.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे १

Web:www.jdhepune.info E_mail - jdhepune@gmail.com

फोन नं.020-26127833/26051632 फॅक्स नं. 020-26051632


क्र.ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८/2536 दि.२०/१०/२०१८

**Maha-DBT Institute Profile Approval Camp**
**Dt.22/10/2018 to 24/10/2018**

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
पुणे जिल्हा.

विषय:- शिष्यवृत्ती योजनांची महा-डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ:- या कार्यालयाकडील क्र.ससं/उशि/पुवि/शिष्यवृत्ती/२०१८, दि.०१/१०/२०१८ व दि.११/१०/२०१८.

उपरोक्त विषयाचे संदर्भात या कार्यालयाकडील उक्त विषयाची वेळोवेळी निर्गमित झालेली परिपत्रके कृपया अवलोकनी घ्यावीत.

महा-डीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अशासकीय महाविद्यालयांच्या विविध शिष्यवृत्त्यांचे आवेदनपत्र सादर करणे व शिष्यवृत्ती वितरणापर्यंतची कार्यवाही करण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे.

महाविद्यालयाकडील प्रस्तुतचे कामकाज करण्यासाठी सर्वप्रथम महाविद्यालयांचे Institute Profile या कार्यालयाकडून मान्य करुन घेणे आवश्यक आहे. यास्तव वेळोवेळी या कार्यालयाने स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रमाचे तसेच प्रोफाईल मान्यतेसाठी जिल्हानिहाय शिबीराचे आयोजन करुन प्रोफाईल मान्यतेचे कामकाज केले आहे. तथापि, बहुतांशी महाविद्यालयांनी अद्याप Institute Profile मान्य करुन घेतलेले नाही. पर्यायाने विद्यार्थ्यांना Online पध्दतीने आवेदनपत्र सादर करता येणे शक्य झालेले नाही.

यापुर्वी सादर करण्यात आलेले Institute Profile महाविद्यालयाच्या परिपुर्ण माहिती अभावी अमान्य केले असल्यास तसेच अद्याप ज्या महाविद्यालयांनी Institute Profile मान्य करुन घेतलेले नाही, अशा महाविद्यालयांसाठी खालील वेळापत्रकाप्रमाणे Institute Profile मान्यता देण्याचे कामकाज करण्यात येत आहे.

सर्व महाविद्यालयांनी या कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे Institute Profile मधील माहिती व्यवस्थितरित्या भरुन मान्यता घेण्यासाठी या कार्यालयाकडे Institute Profile मान्यतेसाठी पाठविण्यात यावे. प्रस्तुतचे कामकाज करणाऱ्या संबंधीत कर्मचाऱ्यांनी ए.के.के. न्यू लॉ ॲकेडमी, अझम कॅम्पस, कॅम्प, पुणे-१ या ठिकाणी

दि.२२/१०/२०१८ ते २४/१०/२०१८ या कालावधीत स.१०.३० ते कार्यालयीन वेळ संपेपर्यंत Institute Profile पडताळणीसाठी व पडताळणीनंतर मान्यतेसाठी आवश्यक सर्व कागदपत्रांसह उपस्थित रहावे.

ज्या महाविद्यालयांचे Institute Profile मान्य झालेले अशा महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती आवेदनपत्र सादर करण्याचे कामकाज अव्याहतपणे सुरु ठेवावे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालय/संस्थास्तरावर स्वतंत्र माहितीगार व्यक्तीची नेमणूक करावी. विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र महाविद्यालयस्तरावरुन अचूकपणे पडताळणी करुन प्राचार्यांनी या कार्यालयास मान्यतेसाठी सादर करावेत.

Institute Profile मान्यता शिबीर असलेल्या उपरोक्त ठिकाणी या कार्यालयाचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याशी सुयोग्य समन्वय साधून महाविद्यालयाचे Institute Profile मान्य करुन घेण्याची कार्यवाही करावी. सदर मान्यताप्राप्त होताच, विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र पडताळणी करुन, या कार्यालयाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत.

उक्त कालावधीत महाविद्यालयांनी Institute Profile मान्य करुन न घेतल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील. शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेला एकही विद्यार्थी महाविद्यालयाच्या दिरंगाईमुळे वा मार्गदर्शनाअभावी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी खुदद प्राचार्यांनी घ्यावी.

(डॉ.विजय नारखेडे)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

स्थळ
प्र 20/10/2018.

प्रत -
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७

२/- यांना कळविण्यात येते की, बहुतांशी कायम विनाअनुदानित महाविद्यालये या योजनेकरीता समाविष्ट झालेले नाहीत. विद्यापीठस्तरावरुन प्रत्यक्ष संपर्क करुन संबंधीतांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.